दिव्यमराठी

औरंगाबाद सिटी

औरंगाबाद. बुधवार, १० जुलै २०१९।५

पान नं. ५

## market watch

# कांचनवाडी कृषि महाविद्यालयात कृषि दिन उत्साहात



**औरंगाबाद -** छत्रपती शाहु महाराज संस्था संचलित कृषि महाविद्यालयात महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मा. वसंतराव नाईक यांची १०६ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. १ जुलै हा दिवस माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांचा जन्मदिवस असतो. याप्रसंगि महाविद्यालयात विविध उपक्रमात हा दिवस साजरा झाला. यावेळी महाविद्यालयाचे संचालक डॉ. डी. के. शेळके सर यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस हार घालुन आदरांजली वाहीली. त्यानंतर इतर कर्मचाऱ्यांनीही त्यांच्या प्रतिमेस अभिवादन केले. ह्या कार्यक्रमासाठी प्राध्यापक वर्ग, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

C.S.M.S.S. College of Agriculture, Aurangabad
Library